सांगली जिल्हयातील ग्रामीण पोलीस स्टेशन गु.नों.क्र.५३/२०१७ (स्त्रीभुण हत्या प्रकरण) मधुन उद्भवणा-या न्यायालयीन प्रकरणामध्ये विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या ॲड.श्री.हर्षद निंबाळकर यांना व्यावसायिक फी मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसपीपी ०४१७/प्र.क्र.९४/पोल-१०
गृह विभाग, २ रा मजला, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मुंबई-४०० ०३२
दिनांक:१८.०५.२०१८

<u>संदर्भ</u> :- शासन अधिसूचना, विधी व न्याय विभाग क्र. एसपीपी २०१७/यु.ओ.आर.१८/डी-१४, दिनांक २० एप्रिल, २०१७

शासन निर्णय:

सांगली जिल्हयातील ग्रामीण पोलीस स्टेशन गु.नों.क्र.५३/२०१७ (स्त्रीभुण हत्या प्रकरण) मधुन उद्भवणा-या न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासनाच्या वतीने कामकाज पहाण्यासाठी ॲड. श्री.हर्षद निंबाळकर यांची विधी व न्याय विभागाच्या वरील संदर्भाधीन दिनांक २० एप्रिल, २०१७ च्या अधीसूचनेद्वारे विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सबब, प्रस्तुत प्रकरणी ॲड. श्री.हर्षद निंबाळकर यांना खालीलप्रमाणे फी अदा करण्यास शासन मान्यता देत आहे.

अ) प्रतिदिन परिणामकारक सुनावणी फी - रु.३५,००० (रुपये पस्तीस हजार फक्त)

ब) हॉटेल लॉजिंग बोर्डिंग (प्रतिदिन) - रु.५,०००/- (रुपये पाच हजार फक्त)

२. प्रस्तुत प्रकरणी ॲड. श्री.हर्षद निंबाळकर यांना अपरिणामकारक सुनावणी फी अथवा इतर कोणतीही फी वा भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत. परिणामकारक सुनावणीचे दिवस तसेच हॉटेल लॉजिंग बोर्डिंगची देयके संबंधीत प्रकरणाच्या पर्यवेक्षीय पोलीस उपायुक्त दर्जाहून कमी नाही, अशा अधिका-याकडून प्रमाणित करुन घेण्यात यावेत व कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त प्रदान होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

३. यासाठी येणारा खर्च या विभागाच्या मागणी क्र. बी-१, २०५५ पोलीस - (००) १०९, जिल्हा पोलीस (००) (०१) जिल्हा पोलीस दल - (२०५५ ०१६८) - २८ व्यावसायिक सेवा या लेखाशीर्षाखालील त्या त्या आर्थिक वर्षाच्या मंजूर अनुदानातून व मासिक निधी विवरणपत्रानुसार भागविण्यात येईल.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२९०/१७/व्यय-७, दिनांक २५.१०.२०१७ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५१८१६०७४०९२२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dinesh Appaji Saste

Digitally signed by Dinesh Appaji Saste
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a49495d0d4b31e36ff1d612a85453ca984b74e28fd6f99cdf66e3e499969e942, cn=Dinesh Appaji Saste
Date: 2018.05.18 16:07:05 +05'30'

(दिनेश आ. सस्ते)
कार्यासन अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस अधीक्षक, सांगली.
३. महालेखापाल१- (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई .
४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
६. ॲड.श्री.हर्षद निंबाळकर, चंबर नं.६८, न्यु लॉयर्स चंबर, सी बिल्डींग, शिवाजी नगर, कोर्ट कंपाऊंड, पुणे- ४११ ००५.
७. विधी व न्याय विभाग (का १४), मंत्रालय, मुंबई.
८. वित्त विभाग (व्यय- ७), मंत्रालय, मुंबई.
९. निवड नस्ती (पोल-१०)